162



13) Chemical Analysis of Water in villege Deulgaon Mahi,Tq.Deulgaon Raja, ...
**S. R. Ingle, K. N. Sonune, D. M. Nagrik, S. S. Kalwaghe, S. S. Kotalwar & R. D. Khalapure, Dist. Jalna (MS) INDIA** ||65

14) A STUDY ON PROPERTY STATUS OF WOMEN POLITICIANS IN DIGBOI LAC
**Pradip Chandra Das, Digboi** ||67

15) Higher Education in India – Issues, Challenges and Suggestions
**Dr. HD GOPAL, RAMANAGARA DISTRCT** ||71

16) The l0ving attitudes of Hero and Heroine in AbhijñânaúâkuntalaA of Kâlidâsa
**Nilachal Mishra, Nayagarh, Odisha, India** ||79

17) गांधी सेवा मंडळाच्या स्थापनेतून दादासाहेब कन्नमवारांचा राष्ट्रीय चळवळीत सहभाग
**प्रा. डॉ. डी. एन. कामडी, जि. गडचिरोली** ||84

18) केरळ राज्यातील महापुरामुळे झालेला सामाजिक बदल : एक समाजशास्त्रीय अभ्यास
**डॉ. विठ्ठल भिमराव मातकर, ता.जि.बीड** ||86

19) मधु सावंत यांच्या कथेतील बदलते ग्रामीण जीवन दर्शन
**प्रा.डॉ. मोरे संगीता दत्ताजी, जि. बीड** ||90

20) विठ्ठल वाघांच्या काव्यातील कृषी आणि कृषकांच्या व्यथेचा शोध
**डॉ. गजानन मुंधे, जि. वाशिम** ||92

21) लावणी : एक संघर्ष
**डॉ. एकनाथ शामराव पाटील, जि. कोल्हापूर** ||96

22) ग्रंथालय तालिकेची तत्त्व व व्यवहार
**प्रा. डॉ रामेश्वर सूर्यभानजी पवार, जि. परभणी** ||98

23) मानवी मनातील करुणेचा मार्ग रुंद करणारी : उच्चावळं
**प्रा.डॉ. व्यंकटी पावडे, नांदेड** ||100

24) अण्णाभाऊ साठे यांच्या कांदबरीतील स्त्री पात्र
**प्रा.डॉ. रंदिल गजेंद्र साहेबराव, जि. उस्मानाबाद** ||103

25) कृषी उत्पन्न बाजार समिती : एक वरदान
**प्रा. डॉ. ए. डी. गोस्वामी, भुसावळ** ||105



www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

Co-ordinator
IQAC

Estd. 1983

PRINCIPAL

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
Vidyawarta®
Peer-Reviewed International Journal
Jan. To March 2020
Issue-33, Vol-04
098

हाते पाटलाचे मुंडक हातात घेऊन रामा कैकाडयाने ज्या झाडाला फास घेतला होता तेथे पाटलाचे मुंडक फेकून दिले. ज्या लिंबाच्या झाडाला रामाने फास घेतला होता त्याच फांदीला साडी बांधून संगिताने आपला जीवनाचा संघर्ष संपवला होता.

इकडे बबलू मोठा अधिकारी झाला होता. दररोज त्याला भेटावयास माणसे येत होती. बबलू पाणी अडवा, पाणी जिरवा योजना राबवत होता.

समारोप-

छावणी कादंबरीमध्ये दुष्काळाशी संघर्ष करत येणाऱ्या अनेक प्रसंगांना सामोरे जाऊन जीवन जगत असताना अन्न, इज्जत, मान, सन्मान या गोष्टी बाजूला ठेवावे लागते. जीवनाशी संघर्ष करताना आपल्या मुलांना सुख देण्याचे स्वप्न पाहणाऱ्या स्वप्न सत्यात उतरविणाऱ्या अशा अनेक संगिता माणदेशात संघर्ष करीत आहेत. हे छावणी : एक उद्ध्वस्त गांव मधून दिसून येते.

संदर्भ

छावणी : एक उद्ध्वस्त गांव प्रा.अनिल मारुती नवात्रे, प्रकाशर्नसुकृत प्रकाशर्न१४शुक्रवार पेठ, पुणे२०१६
झोंबी डॉ. आनंद यादव
बारोमास सदानंद देशमुख, कॉन्टिनेन्टल प्रकाशन
कापूसकाळ कैलास दौंड, प्रकाशक मीरा बुक्स, औरंगाबाद.

❑❑❑

22

# ग्रंथालय तालिकेची तत्व व व्यवहार

प्रा. डॉ रामेश्वर सूर्यभानजी पवार
ग्रंथपाल,
श्री गुरु बुध्दी स्वामी महाविद्यालय पूर्णा (ज.),
जि. परभणी

प्रत्येक ग्रंथालय ही संस्था वर्धिष्णू आहेत ग्रंथालयात दरवर्षी पुस्तकांची संख्या वाढत जाते. शालेय ग्रंथालय, विद्यापीठ, माहविद्यालयीन सार्वजनिक राष्ट्रीय संशोधन या पैकी कोणत्याही प्रकारचे ग्रंथालय असते. त्यात दरवर्षी ग्रंथ खरेदी केल्या जाते व ग्रंथालयातील असलेले साहित्य वाढत जाते. गंथालय हे चिरकाल टिकणारे आहे ही वाढती संख्येचा विचार करता ग्रंथापालाला प्रत्येक ग्रंथाची माहिती लक्षात ठेवणे कठीण जाते. ग्रंथालयात येणारा वाचक वर्ग हा वेगवेगळ्या प्रकारचे प्रश्न विचारत असतो. उदा. १) झाडाझडती कादंबरी आहे काय? २) प्र.के. अत्रेंची किती पुस्तके ग्रंथालयात आहेत? ३) स्पर्धा परीक्षेची व नेट सेट वरची पुस्तके ग्रंथालयात आहेत काय? ४) चरित्र असलेली पुस्तके किती अथवा प्रवास वर्णनाची पुस्तके कोणती?

अशा आणि इतर ग्रंथासंबंधी बऱ्याच प्रश्नांनी योग्य उत्तरे द्यावयाची असतात तर ग्रंथालयातील ग्रंथाची मांडणी व वाचणीय साहित्यासह तालिकिकरण करणे आवश्यक आहे. पहिल्या पासुन (ग्रंथालय सुरू झाल्या पासुन) तालिकीकरण करणे चांगल्या ग्रंथालयात पाच हजाराच्या वर ग्रंथ संख्या झाल्यास आवश्यक तालिकीकरण करावं लागते.

२१ व्या शतकात संगणक शास्त्राच्या युगात निरनिराळया विषयावर संशोधन होत आहे.

संशोधक नवनवीन शोध लावीत असतो आणि या शोधामुळे जगातील लोक एक पुस्तकाच्या जवळ



Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna
Estd. 1983
PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya

येत असतात नविन माहिती ग्रंथालयात ठेवली जाते. वाचकांना ही माहिती आपल्या ग्रंथालयात उपलब्ध आहे. साहित्यातुन मिळते हे समजणे अत्यावश्यक आहे. हे साहित्य वाचकांना कमी वेळात उपलब्ध करून देणे ग्रंथालयाचे काम आहे.

**व्याख्या डॉ. रंगनाथन एस.आर. यांच्या मते :—** Classified cataloguecode या पुस्तकातील सर्वसाधारणपणे ग्रंथालयीन तालिक म्हणजे ग्रंथालयीन साहित्याची यादी किंवा त्यातील काही भागांची यादी म्हणजेच ग्रंथालयातील तालिकरणच्या वर्णनातील महत्वाचे घटक म्हणजे यादी, विशिष्ट अणि संपुर्ण माहिती होय.

अशा प्रकारची तालिका जेव्हा एका पेक्षा जास्त ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या वाचक साहित्याची माहिती देते तेव्हा त्यास म्हणजे संयुक्त तालिका अथवा संघ तालिका असे म्हणतात.

तालिका म्हणजे शास्त्रयुध्द पद्धतीने मान्यता प्राप्त तालिकीकरण संहितेनुसार वाचन साहित्याची केलेली यादी होय.

या तालिकेवरून ग्रंथालयात असणाऱ्या उपलब्ध साहित्याचा वेध घेता येतो. विशिष्ट विषयाची लेखनाची पुस्तके किती आहेत. ग्रंथाची विशिष्ट आवृत्ती आहे का? विशिष्ट ग्रंथाच्या प्रती किती आहेत.? विशिष्ट विषयाची वेगवेगळया लेखकाची पुस्तके किती अशा प्रकारची माहिती तालिकेवरून समजु शकते.

तसेच तालिका हा ग्रंथालयाचा आरसा आहे.

एखाद्या वाचकाला एखाद्या ग्रंथाच लेखक माहित असेल तर ग्रंथकार तालिका पहा. विषय माहित असेल तर विषय तालिका पहा. नसता ग्रंथनाम माहित असेल तर ग्रंथनाम तालिका पहा. चटकन ग्रंथलयात ग्रंथ आहेत का? आणि असल्सास किती प्रती आहेत याचा वर्गांक तो घेवून कपाटावरती जा आणि तो नंबर ग्रंथालय कर्मचाऱ्यास दाखविल्यावर तुम्हाला चटकन ग्रंथ मिळू शकतो.

**तालिकेची वैशिष्टये :**

१. वाचकांना तालिका सहजपणे मुक्तपणे हाताळता येते.

२. तालिकेत ग्रंथालयातील सर्व साहित्याची ओळख होते अथवा माहिती होते.

३. वाचनीय साहित्याची आवश्यकता ती सर्व माहिती उदा : ग्रंथकार, विषयक, ग्रंथनाम, पृष्ठक्रमांक इ. देण्यात येते.

४. अशा यादया शास्त्रशुद्ध नियमाप्रमाणे केलेल्या असतात.

**तालिकीकरणाच्या पद्धती :**

मान्यता प्राप्त महत्वाच्या दोन तालिका संहिता आहेत.

१. ॲंग्लो अमेरिकन तालिकीकरण संहिता.

२. वर्गीकृत तालिका संहिता. आकार ५ बाय ३ असतो या पत्रावर ग्रंथाचा मजकुर टंकलिखित अथवा हस्तलिखित लिहु शकतो.

उदा :— महाराष्ट्र सारस्वत/विनायक लक्ष्मण भावे १८९७—१९२३ टीपा व पुरवणीसह संपादक शंकर गोपाल तुळपुळे/५ वी आवृत्ती/ पाप्युलर प्रकाशन. मुंबई १९८२/८०—१०८ पृष्ठे. कापडी बांधणी किमत रू. ४०/ दाखल अंक १८०[illegible] वर्गांक ८९१.४६ वर्गीकरण किंवा तालिकीकरण या सारख्या तांत्रिक बाबी करावयाच्या म्हणजे पैसा, श्रम, वेळ इत्यादी बाबी येतात. त्यामुळे ग्रंथालय स्थापनेपासुन या बाबी पूर्ण केल्यास सक्षम ग्रंथालय सेवा होण्यास मदत होते.

**ग्रंथालय तालिकेची उद्दिष्टे व कार्य :—**

**कहर यांच्या मते —**

१. वाचकाला एखादा ग्रंथाचा, लेखक, ग्रंथनाम, विषय माहित असल्यास ते पुस्तक शोधण्यास मदत होते.

२. ग्रंथालयातील उपलब्ध सर्व साहित्याची एखादया लेखन बाबत. विशिष्ट विषयानुसार, विशिष्ट साहित्याच्या प्रकारानुसार माहिती देणे.

३. वाचकांना ग्रंथ निवडण्यासाठी एखादया ग्रंथाची आवृत्ती बाबत विशिष्ट वैशिष्टये अथवा त्यातील साहित्याबाबत माहिती देणे.

**ग्रंथ तालिकीकरणाचे कार्य :**

**१. ग्रंथालयात विशिष्ट ग्रंथ आहे काय हे खालील माहिती वरून सांगणे.**



Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Estd. 1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

Vidyawarta®
Peer-Reviewed International Journal

Jan. To March 2020
Issue-33, Vol-04

0100

१. ग्रंथाचा लेखक आणि ग्रंथनाम

२. ग्रंथाचा लेखक माहित नसल्यास केवळ ग्रंथनाम

३. जर वरील दोन्ही मधील दोन्ही बाबी माहित नसतील तर योग्य त्या माहिती नुसार ग्रंथाची उपलब्धता सांगणे.

२. ग्रंथालयात

१. एखादया लेखकाने कोणकोणते ग्रंथ उपलब्ध आहेत.

२. एखादया ग्रंथाची कोणती आवृत्ती उपलब्ध आहे याची माहिती देणे.

वरील कार्य १९६१ मध्ये पॅरिस येथे झालेल्या तालिकिकरण तत्वावरील परिषदेने तिच्यात केले आहे.

➢ तालिका ग्रंथालयात सर्व साहित्याची माहिती देणे.

➢ सदर साहित्य ग्रंथालयात नेमके कोठे ठेवले आहे.

➢ एखादया लेखकाचे किती व कोठले ग्रंथ ग्रंथालयात आहेत.

➢ वाचकाला ग्रंथ निवडीचे काम सहजपणे होते.

➢ ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना नवीन मागविण्यापुर्वी त्याची उपलब्धता तपासता येते.

वरील सर्व माहितीवरूने आपल्या लक्षात येते की, ग्रंथालयातील तालिकाला अनन्यसाधारण महत्व आहे. ग्रंथालय कर्मचाऱ्यांचा कामाबद्दल, तत्परतेबद्दल आणि दर्जाबद्दल माहिती ग्रंथालय तालिका पाहताच कळते म्हणुन ग्रंथालयातील हा विभाग अत्यंत महत्वाचा आहे.

संदर्भ ग्रंथ :—

1- Agrawal, Vibhuti :-Library acquisitions and cataloguing descriptions, New Delhi : Rajat Publications, 2003

2- Chapman, Liz :- How to catalogue London : Clive Bingley, 1984

3- Datta, D.N.:- Library Cataloguing Calcutta : World Press, 1980

4- Dilli, K.T. :- Basics of Library and information Science. New Delhi : vikas Publishing house pvt. Ltd., 1997

**23**

# मानवी मनातील करुणेचा मार्ग रुंद करणारी : उष्टावळं

प्रा.डॉ. व्यंकटी पावडे
के.आर.एम.महिला वरिष्ठ महाविद्यालय वजिराबाद, नांदेड

एक निखळ माणूस, उत्तम चित्रकार, बालसाहित्यिक, कवी, कादंबरीकार व सुंदर हस्तलेखक म्हणून साहित्यिक गजेंद्र कपाटे यांची सर्वदूर अशी ओळख आहे. त्यांची घाण्यांची विराट सभाड हा बालकाव्यसंग्रह प्रसिध्द आहे. गाव खेड्यातील दलित-सवर्णांच्या सामाजिक जीवनाची उत्तम जाण असणारा, समताप्रिय विचार बाळगणारा हा लेखक, आपल्या लेखनीद्वारे मानवी मनातील मानवता आणि करुणेचा मार्ग रुंद करू पाहत आहे. 'उष्टावळं' ही दोनशे आठ पृष्ठांची, निर्मल प्रकाशन, नांदेड. या प्रकाशनाने प्रकाशित केलेली कादंबरी. दोन विषम समाज जीवनातील सांस्कृतिक संघर्ष व्यक्त करणारी आहे. दलित सवर्ण यांच्यातील आंतरिक संघर्ष व भावनिक पातळीवरील दुरावा लेखकाने या कादंबरीत प्रखर वास्तवपणे मांडला आहे.

दुकानाच्या पाट्या, रस्त्यावर उभे असणारे बोर्ड आणि वॉल पेंटिंग करणारा हा पेंटर माणूस गावातील दलित माणसाचे दुःख, वेदना पाहूण व्यथित होतो हा व्यथितपणा इ.स. १९७० च्या आसपासचा आहे. ही कादंबरी दलित साहित्य चळवळीला नवी दृष्टी व ऊर्जा प्रदान करणारी आहे. दलित माणसांचे मन, त्यांची भावना, त्यांची जगण्याची पध्दत अस्वस्थकारकपणे या कादंबरीमध्ये येते. दलित मनातील खंत व्यक्त करणे हा या कादंबरीचा उद्देश नाही; तर बुध्द- फुले-शाहू डॉ.बाबासाहेब आंबेडकर याना अभिप्रेत असणारी समता, मानवता व नवसमाज निर्माण करणे हा उद्देश आहे. बुध्दांना हवी असणारी करुणा व सम्यक दृष्टी या कादंबरीत पदोपदी येते. दलितांच्या समाज जीवनातील संघर्ष, चिकित्सा, व्यवस्थेची चिरफाड व जाब विचारणाऱ्या प्रश्नांचा भडीमारही यामध्ये येतो.

उष्टावळं धरा ! उष्टावळं धरा !! पोर हो, उष्टावळं आवरून तावडतोब, जमेल्या, पंगतीच्या बाहेर न्हा बरं का ? मंजी, नाहक



Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511

Estd. 1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani